नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०६/२०२६ (शुक्रवार )

---

# नागपूर ग्रामीण जिल्हयात नव्याने कार्यान्वित झालेल्या मोहपा पोलीस स्टेशनला मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांनी दिली भेट

नागपूर ग्रामीण जिल्हयात नव्याने स्थापन होऊन दिनांक १३/०६/२०२६ रोजी पासून कार्यान्वित झालेल्या मोहपा पोलीस स्टेशनला आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी भेट देऊन पोलीस स्टेशनच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

भेटी दरम्यान मा. पोलीस अधीक्षक यांनी पोलीस स्टेशनमधील प्रशासकीय व्यवस्था, गुन्हे नोंदणी प्रक्रिया, कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळाची उपलब्धता तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवांची माहिती घेतली. नव्याने सुरू झालेल्या पोलीस स्टेशनच्या कार्यपद्धतीचा आढावा घेऊन आवश्यक सूचना देवुन मार्गदर्शन केले. तसेच मोहपा पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांना तत्पर पोलीस सेवा उपलब्ध करून देणे, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत सुचना दिल्या.

सदर भेटी दरम्यान मा. श्री हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या सह श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर, पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर, पोलीस निरीक्षक श्री ईश्वर हनवते, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मोहपा हजर होते.




NAGPUR DISTRICT (RURAL)
INDEX
I.P.S.



# मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड , २ आरोपी अटक काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल येथे नंदकिशोर शांताराम चरडे ,वय ५९ वर्षे, रा शारदा चौक काटोल यांनी तक्रार दिली की दिनांक ०३/०६/२६ रोजी रात्री ०१/३० वा फिर्यादीची वापरती हीरो स्पेंडर मोटर सायकल क्र एम एच ४० यु ०३०४घराचे बाहेर लॉक लावुन उभी करून ठेवली होती. कोणतरी अज्ञान चोरटयाने नमुद मोटर सायकल चोरी केल्याने फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून दिनांक १८/०६/२०२६ रोजी आरोपी क्र. ०१) आशिष उर्फ सचिन हरिशचंद्र मुन्ने ,वय २५ वर्षे आणि आरोपी क्र. ०२) रोहित जगदीश तिरपुरकर, वय २५ वर्षे, दोन्ही रा.**

सोनोली, ता. काटोल, जि. नागपूर यांना ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांना कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी नमुद मोटर सायकल चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. पोलीसांनी नमुद आरोपीकडुन हीरो स्पेंडर मोटर सायकल क्र एम एच ४० यु ०३०४ किंमती १०,०००/— रूपये जप्त केली.



# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०३ गोवंश जनावरांची सुटका, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १७/०६/२०२६ रोजी काटोल पोलीसांना रात्रगस्ती दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी येनवा ते मोहखेडी रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक संशयित वाहन येताना दिसले. कार क्र. एम एच १२/क्यु ,जी ४३३२ या वाहनाला पोलीसांनी थांबविण्याचा इशारा केला असता यातील कार चालकं पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन घटनास्थळाहुन पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता कार क्र. एम एच १२ क्यु जी ४३३२ मध्ये एकुण ०३ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन करता कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून कार क्र. एम एच १२/क्यु ,जी ४३३२ किंमती ५,००,०००/—रूपये आणि ०३ जनावरे किंमती ७०,०००/—रूपये असा एकुण ५,७०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपी विरूद्ध कलम ११(१), (ड), (ई) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम ९, ५(ए) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, कलम २३/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# साईबाबा ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेच्या अभिकर्त्यास अपहार व फसवणुकीच्या गुन्हयात करण्यात आली अटक

**पोलीस स्टेशन अरोली** :— पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील साईबाबा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, कोदमेंढी येथील दैनिक अभिकर्ता देवानंद बळीराम लिमजे, वय ४० वर्षे, रा. कोदामेंढी, ता. मौदा, जि. नागपूर याच्याविरुद्ध अपहार व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, आरोपी देवानंद बळीराम लिमजे हा साईबाबा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, कोदमेंढी येथे दैनिक अभिकर्ता म्हणून कार्यरत होता. त्याच्याकडे इंदोरा, इंद्रपुरी, वाकेश्वर, धर्मपुरी, इजनी, बोरी घिवारी, धानोली, सावंगी, शिवाडौली, अडेगाव गावांमधील खातेदारांकडून दैनिक बचत वसुली करून ती रक्कम संस्थेत जमा करण्याची जबाबदारी होती. आरोपी हा पतसंस्थेत संस्थेत दैनिक अभिकर्ता म्हणून कर्तव्य पार पाडत असताना खातेदारांनी विश्वासाने दैनिक रक्कम पतसंस्थेत भरण्याकरिता आरोपी कडे दिले असता त्याने ते स्वत:च्या फायद्याकरिता वापरले तसेच खातेदाराच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या करून पिग्मी कर्ज रकमेची उचल करून त्या रकमेचा स्वत: करिता वापर करून ८६ खातेदारांच्या एकूण ६ लाख ५२ हजार ३० रुपये रक्कमेचा अपहार केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सदर प्रकरणी अरोली पोलीस स्टेशन येथे आरोपीविरूध्द कलम ३१६ (५),३१८(४), ३३६(२), ३३६(३),३३८,३४०(२) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी देवानंद बळीराम लिमजे यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. दिनांक २०/०६/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.**

# प्रतिबंधीत मांगुर माशांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक १७/०६/२०२६ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **प्रतिबंधीत मांगुर माशांची वाहतुक केली जात आहे. मिळालेलया माहीतीच्या आधारे पारशिवणी पोलीसांनी** नागपूर—जबलपूर राष्ट्रीय महामार्गावरील आमडी फाटा येथे नाकाबंदी केली असता एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक के ए ४०ए ६४१५ मिळुन आला त्यांची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत मांगुर मासे आढळून आले.

पारशिवणी पोलीसांनी सदर माहीती सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, नागपूर कार्यालय यांना देत त्यांच्या फिर्यादीवरून **आरोपी वाहन चालक राजेश चक्रवर्ती,वय ४७ वर्ष रा. बर्गी जबलपूर राज्य मध्य प्रदेश आणि क्लीनर मोहम्मद पप्पू, वय ५० वर्ष राहणार आधारताल जबलपूर मध्यप्रदेश** यांच्या विरूध्द भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम २२३, २७२, २७५ ,३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**सदर प्रकरणात ट्रकमध्ये अंदाजे ९ टन वजनाचे प्रतिबंधित मांगुर मासे किंमत ८,५०,०००/— रूपये आणि ट्रक क्रमांक के ए ४०ए ६४१५ किंमती २०,००,००० /—रूपये असा एकुण २८,५०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नाशवंत मुद्देमालाचा नाश करण्यात आाल आहे.**


AIMANN

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद,२ लाख ६२ हजार ४३० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १७/०६/२०२६ रोजी रात्री उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, एमआयडीसी उमरेड परीसर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अतुल आंनदराव दुरबुडे, वय ३८ वर्ष, रा. धुरखेडा २) सागर श्रावणजी गीरडकर, वय २८ वर्ष, रा. ढबाले विहीरजवळ मंगळवारी पेठ, उमरेड ३) अंकीत हीरामणजी ढोबळे, वय २८ वर्ष, रा. उमरेड** यांना जागीच पकडले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून १) ३ मोबाईल २) ०५ मोटार सायकल ३) रोख रक्कम २,४३०/—रूपये ,४) ५२ ताशपत्ते आणि इतर साहीत्य असा एकुण २,६२,४३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध , रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक १६/०९/२०२५ रोजी अप क्र ७४९/२०२५ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १७ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्रीमती आरती नरोटे आणि तपास पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १९/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी मौजा बोरीमजर ता. उमरेड येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस आणि आरोपी बादल दिलीप भागडकर, वय २२ वर्षे, रा. सोनेगाव ता पारशिवणी यांना मौजा बोरीमजर ता. उमरेड येथुन ताब्यात असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध , कोंढाळी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दिनांक १८/०२/२०२६ रोजी अप क्र १०५/२०२६ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १६ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांच्या नेतृत्वात तपास पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १८/०६/२०२६ रोजी गोपनिय माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी ही गांधी नगर , ता. जि. कोल्हापुर येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीचा शोध घेवुन तिला

तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करीत आहेत.

.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक १८/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण २९,९४९/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे लोकेश वासुदेव वाघमारे, वय ३३ वर्षे, रा. जयस्तंभ चौक, मौदा, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी नामे बादल वासुदेव ताकतोडे, वय ३७ वर्ष, रा.मातंगपुरा, ता. काटोल जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे रवि सुरेंद्रजी गजभिये, वय ४४ वर्ष रा. प्रभाग क्रं. २ पेंच रोड पारशिवनी, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपी** अरविंद मोतिलाल गुजर, वय ३६ वर्षे,रा.वार्ड क्र.०२ नगरधन याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी १) दिपक उर्फ सोनू चक्रधर आवते, वय ३४ वर्षे, रा यशवंतबाबा, झोपडपटटी वार्ड क्रं ६, सावनेर , २) मोनू प्रकाश नाडेकर वार्ड क्रं ०९ चिचपूरा, सावनेर आणि ३) महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे शेषराव नागो उईके, वय ५५ वर्ष रा सोनपुर ता सावनेर जि नागपूर आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** गोंविदा मोतीसिंग बावरी, वय ३३ वर्ष, रा गुरूदवारा चे मागे सरदार मोहल्ला कळमेश्वर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १४६७० मिली देशी दारू, ६८४० मिली विदेशी दारू, ६४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण २९,९४९/- रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने